नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

अहिल्यानगर | अंक १४६ | वर्ष ५० वे | मंगळवार, १७ जून २०२५ | पाने १२ | किंमत ₹ ६

## महत्वाचे

### कुंडमळा शोधमोहीम थांबवली

**पुणे (प्रतिनिधी)–** मावळ तालुक्यातील इंद्रायणी नदीवरील कुंडमळा पूल कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेनंतर रविवारपासून सुरू असलेली मोठी शोधमोहीम अखेर सोमवारी सायंकाळी ६ वाजता थांबवण्यात आली आहे. या दुर्घटनेत चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, ५१ जण जखमी झाले आहेत. सुदैवाने मृतांचा आकडा वाढलेला नाही. दरम्यान, जखमींपैकी ३५ जणांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

कुंडमळा येथील पूल दुर्घटनेनंतर रविवार दुपारी ३.३० वाजता सुरू झालेले बचावकार्य तब्बल २५ तासांनंतर संपले. बचाव पथकांनी बोटीद्वारे इंद्रायणी नदीचे शेवटचे निरीक्षण केले असून, दिवसभरात नदीपात्रात कोणतीही व्यक्ती आढळली नाही. मावळचे उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले यांनी सोमवारी सायंकाळी ६ वाजता बचावकार्य थांबवल्याची माहिती दिली. या शोधमोहिमेत अनेक संस्था आणि अधिकारी सहभागी झाले होते. यामध्ये वन्यजीव संस्था, आपदा मित्र, तसेच रोहा व महाड येथील आपत्ती व्यवस्थापन संस्था यांनीही भाग घेतला.

### प्रती दिंडी २० हजारांचे अनुदान जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)–** आषाढी एकादशी यात्रेच्या निमित्ताने पंढरपुरात दाखल होणाऱ्या राज्यातील १ हजार १०९ दिंडयांना राज्य सरकारने प्रत्येकी २० हजार रुपयांचे अनुदान जाहीर केले आहे. सरकारने या अनुदानाचा खर्च गेल्या वर्षी प्रमाणे सामाजिक न्याय विभागाच्या माथी मारला आहे. याआधी सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या निधीसाठी सामाजिक न्याय खात्याच्या निधीला हात घातला आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या प्रत्येक दिंडीला २० हजार रुपयांचे अनुदान जाहीर केले होते. या पार्श्वभूमीवर यंदा ६ जुलैच्या आषाढी एकदशीसाठी दिंड्यांना २० हजार रुपयांचे अनुदान देण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केले होते. त्यानुसार सामाजिक न्याय विभागाने सोमवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. १ हजार १०९ दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपये याप्रमाणे एकूण २ कोटी २१ लाख ८० हजार रुपये वितरित करण्यास विभागाने मान्यता दिली आहे.

# जातनिहाय जनगणनेची अधिसूचना जारी

**नवी दिल्ली–** केंद्र सरकारने देशात होणाऱ्या जनगणनेसाठी राजपत्र अधिसूचना जाहीर केली आहे. २०२७ मध्ये ही जनगणना होणार असून ती दोन टप्प्यात केली जाईल असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ही घोषणा करताना सांगितलं. यासाठी प्रत्येक स्तरावरील लोकांकडून माहिती घेतली जाणार असून हे डिजिटल माध्यमातून म्हणजेच मोबाईल प्लिकेशन्समधून केले जाईल. दरम्यान, २०२७ ला होणाऱ्या या जनगणनेच्या सर्वेक्षणाबद्दल या १० महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेणं अत्यंत आवश्यक आहे .

**२०२७ च्या जनगणनेशी संबंधित १० महत्त्वाच्या गोष्टी**

१) या जनगणनेत सर्वेक्षण दोन टप्प्यात होणार असून ३४ लाख सर्वेक्षक घरोघरी, शेतात जाऊन माहिती गोळा करतील.

२) याशिवाय १.३ लाख जनगणना अधिकारी तैनात केले जातील. हे सर्व कर्मचारी जनगणनेसाठी क्षेत्रीय सर्वेक्षणाचे काम करतील. याचा संपूर्ण विदा तयार केला जाईल. या अंतर्गत जातीनिहाय प्रश्नही विचारले जातील.

३)जनगणना डिजिटल पद्धतीने केली जाईल. यासाठी मोबाईल प्लिकेशन वापरण्यात येणार आहे.

४)मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार दोन टप्प्यात होणाऱ्या या जनगणनेत पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि घरांची मोजणी केली जाईल.



५)यामध्ये प्रत्येक कुटुंबाची निवासी स्थिती,मालमत्ता आणि सुविधांबद्दल माहिती गोळा केली जाईल.

६)जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक घरात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची लोकसंख्या शास्त्रीय सामाजिक आर्थिक सांस्कृतिक आणि इतर माहिती गोळा केली जाईल.

७)या जनगणनेत जातीय जनगणना देखील केली जाईल. जनगणना प्रक्रिया सुरू झाल्यापासून ही सोळावी जनगणना आहे आणि देशाच्या स्वातंत्र्यानंतरची ८वी जनगणना आहे.

८) लोकांना स्वगणनेची तरतुदही उपलब्ध करून दिले जाईल.

९)जनगणनेशी संबंधित सर्व डेटाची गोपनीयता आणि सुरक्षितता राखण्यासाठी संपूर्ण व्यवस्था केली जाईल.

१०)यामध्ये जनगणनेसाठी डेटा गोळा करणे, हस्तांतरित करणे आणि साठवणे तसेच प्रत्येक टप्प्यावर (पान ६ वर)

### जनगणनेनंतर सीमांकन

- जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया १ मार्च २०२७ पर्यंत पूर्ण केली जाईल. जी सुमारे २१ महिन्यांत पूर्ण होईल. जनगणनेचा प्राथमिक डेटा मार्च २०२७ मध्ये जाहीर केला जाऊ शकतो, तर तपशीलवार डेटा जाहीर करण्यासाठी डिसेंबर २०२७ पर्यंत वेळ लागेल. यानंतर, लोकसभा आणि विधानसभा जागांचे सीमांकन २०२८ पर्यंत सुरू होऊ शकते. या काळात, महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण देखील लागू केले जाऊ शकते. म्हणजेच, २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी, महिलांसाठी राखीव जागांचे चित्र स्पष्ट होऊ शकते. जनगणनेनंतर, लोकसंख्येनुसार लोकसभा जागांचे वाटप करता यावे म्हणून सीमांकन आयोग स्थापन केला जाईल. दक्षिणेकडील राज्यांमध्ये याबाबत समस्या वाढत आहे कारण तेथील लोकसंख्या उत्तर भारतीय राज्यांपेक्षा कमी आहे. अशा परिस्थितीत, जागा कमी झाल्यामुळे लोकसभेतील त्यांचे प्रतिनिधित्व कमी होऊ शकते अशी भीती त्यांना आहे. अशा परिस्थितीत, सरकारला सीमांकनावर खूप विचार करावा लागेल. तथापि, सीमांकन प्रक्रियेत दक्षिणेकडील राज्यांच्या चिंता लक्षात घेतल्या जातील असे आश्वासन सरकारने दिले आहे.

# मान्सून पुन्हा सक्रिय

## मुंबई, पुण्यासह राज्याच्या विविध भागात मुसळधार

**पुणे (प्रतिनिधी)–** विश्रांतीनंतर नैऋत्य मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय झाला आहे. सोमवारी मान्सूनने महाराष्ट्राचा ९५ टक्के भाग व्यापला असून, पुढील दोन दिवसांत मान्सून पूर्ण राज्य व्यापणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.दरम्यान, दक्षिण गुजरातच्या भागावरील या क्षेत्राची तीव्रता वाढून, त्याचे येत्या २४ तासांत कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतर होणार आहे. तसेच हे क्षेत्र उत्तर पश्चिमेच्या दिशेने प्रवास करणार आहे. याच्या प्रभावामुळे मंगळवारी मुंबईसह संपूर्ण कोकण पट्ट्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

दरम्यान, मुंबईसह उपनगरे तसेच पुणे व



परिसरात जोरदार पाऊस झाला.

२६ मेनंतर राज्यातून मान्सूनने ब्रेक घेतला होता. गेले चार ते पाच दिवस राज्यात मुसळधार पाऊस होत असून, त्यामुळे मान्सूनला गती मिळाली आहे. संपूर्ण उत्तर (पान ६ वर)

### भंडारदरा पाणलोटात पावसाचे सातत्य

**भंडारदरा (वार्ताहर)–** उत्तर नगर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या भंडारदरा धरण परिसर व पाणलोटात काल दिवसभर अधूनमधून पाऊस कोसळत असल्याने या भागातील जनजीवन गारठून गेले आहे.

गत दोन दिवसांपासून पावसाचे सातत्य टिकून असल्याने डोंगरदऱ्यांवरील धबधबे सक्रीय झाले असून ओढेनाले खळखळत धरणात सामावत आहेत. या पावसाळी वातावरणामुळे परिसरातील सौंदर्य फुलून गेले आहे. रस्ते धुक्याने लेपाटून गेले असून वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. पाणलोटात काही ठिकाणी धुण्याही पेटल्या आहेत. भात खाचरांमध्ये पाणी साचल्याने रोपेही जोमाने वाढत आहेत. पावसामुळे धरणातील होणारी आवक काहिशी वाढली आहे. निळवंडे धरणातही नवीन पाण्याची आवक होत आहे.

### पिंपळगाव खांड धरणात नवीन पाण्याची आवक

**कोतूळ (वार्ताहर)–**मुळा धरणाच्या पाणलोटात काल सोमवारी पावसाचा जोर काहीसा वाढल्याने अकोलेतील मुळा नदी पुन्हा वाहती झाली असून ६०० दलघफू क्षमतेच्या धरणात नव्याने पाण्याची आवक सुरू झाली आहे. या धरणात सुमारे ४०० दलघफू पाणीसाठा होता.

मध्यंतरी पाऊस गायब झाल्याने या भागातील शेतीकामे थंडावली होती. पण आता दोन दिवसांपासून या भागात मान्सून सक्रिय झाला आहे. अधून मधून पावसाच्या सरी कोसळत आहेत. त्यामुळे मुळा नदी १५० क्युसेकने वाहती असून या नदीतील पाणी पिंपळगाव खांड धरणात जमा होत आहे. पावसाचे प्रमाण वाढल्यास हे धरण दोन तीन दिवसांत ओव्हरफ्लो होईल.

# संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ दिंडी सोहळा अहिल्यानगर जिल्ह्यात दाखल

## पारेगाव बुद्रुक येथे दिंडीचे फटाक्यांच्या आतिषबाजीत स्वागत

**तळेगाव दिघे (वार्ताहर)–** श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून श्री क्षेत्र पंढरपूरकडे हरिनामाचा जयघोष करीत निघालेल्या संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज दिंडी व पालखी सोहळा सोमवारी (दि.१६) दुपारी ४.३० वाजेच्या सुमारास अहिल्यानगर जिल्ह्यातील पारेगाव बुद्रुक (ता. संगमनेर) येथील आश्वीनाथ गड डोंगर परिसरात दाखल होताच लेझीम पथक, फटाक्यांची आतिषबाजी आणि जेसीबीतून फुलांच्या वर्षावात अधिकारी, पदाधिकारी व ग्रामस्थांनी जोरदार स्वागत केले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज दिंडी व पालखी सोहळ्यात हजारोंच्या संख्येने भाविक वारकरी सहभागी झाले आहेत. पारेगाव बुद्रुक येथील आश्वीनाथ गड डोंगर परिसरात दिंडी व पालखी सोहळा दाखल होताच हरिनामाचा जयघोष करीत भक्तिमय वातावरणात पदाधिकारी व ग्रामस्थांनी जोरदार स्वागत करीत पालखीचे दर्शन घेतले. आमदार अमोल खताळ, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, थोरात साखर कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात, अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लंगोरे, प्रांताधिकारी अरुण उंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, तहसीलदार धीरज मांजरे, पोलीस निरीक्षक देवीदास ढुमणे, निमोणचे सरपंच संदीप देशमुख, पंचायत समितीचे माजी उपसभापती नवनाथ अरगडे, ॲड. त्रिंबक गडाख, साहेबराव गडाख, सरपंच संध्या (पान ६ वर)



- जिल्ह्यात प्रवेश करताना दरवर्षी माजी मंत्री बाळासाहेब थोरात उपस्थित राहून पालखीचे स्वागत करतात. ते दिल्लीत असल्याने त्यांनी दूरध्वनीवरून वारकरी व गावकऱ्यांशी संवाद साधला. तसेच वारकऱ्यांसाठी एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टच्या माध्यमातून रुग्णवाहिका, अमृत उद्योग समूहातील संस्थांच्या माध्यमातून राहण्याची सुविधा, पिण्याच्या पाण्याचा टँकर, दवाखाना, वीज आदी सुविधा उपलब्ध करून देताना संगमनेर तालुक्यातून दिंडी जाऊपर्यंत सर्व सुविधा पुरविण्याच्या सूचना यशोधन व अमृत उद्योग समूहाला त्यांनी दिल्या आहे.

# बदलीसाठी बोगस 'आंधळे, पांगळे' होणाऱ्यांवर आता फौजदारी

## ग्रामविकास विभागाने काढले आदेश; साशंकता असणाऱ्या प्रमाणपत्रधारकांची होणार शल्यचिकित्सामार्फत तपासणी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातंर्गत बदली प्रक्रियेतून सुटका व्हावी अथवा सोय व्हावी, यासाठी बोगस अपंगत्व प्रमाणपत्र, घटस्फोट, परितक्त्या असण्याची बोगस कागदपत्रे रंगवणाऱ्या प्राथमिक शिक्षकांविरोधात आता ग्रामविकास विभाग आक्रमक झाला आहे. दिव्यांग व वैद्यकीय प्रमाणापत्रांमध्ये व घटस्फोटाच्या आदेशामध्ये, तसेच परितक्त्या असल्याबाबतच्या स्वयंघोषणापत्रामध्ये काही अनियमितता केल्याचे आढळून आल्यास, अशा शिक्षकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावे. संबंधित शिक्षकांचे निलंबन करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट आदेश ग्रामविकास विभागाने काढले आहेत.

याबाबत सोमवार (दि.१६) रोजी ग्रामविकास विभागाच्यावतीने सुधारित आदेश काढत बोगस प्रमाणपत्र अथवा बनावट अपंग असणाऱ्या आंधळे, पांगळे यांना सरळ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात ज्या शिक्षकांच्या अपंगत्व प्रमाणपत्राबाबत साशंकता असले, अशा सर्व शिक्षकांची जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मार्फत पुन्हा तपासणी करण्यात यावी. संबंधितांच्या अपंग प्रमाणपत्राची ऑनलाईन युडी- आयडी प्रमाणपत्राची



नेमण्यात आलेल्या त्रिसदस्यी समिती मार्फत तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

जिल्ह्यात प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हातंर्गत बदलीमध्ये पळवाट काढण्यासाठी काहीजण बोगस अपंगत्वाचा आधार घेतांना दिसत आहेत. जिल्ह्यात यापूर्वी २०१२ मध्ये ७५ शिक्षकांचे प्रमाणपत्र तपासणीनंतर बनावट असल्याचे सिध्द झालेले होते. त्यानंतरही हा प्रकार थांबलेला दिसत नाही. यंदा (२०२५ मध्ये) शिक्षकांच्या बदल्यांची प्रक्रिया अद्याप झालेली नाही. मात्र, शिक्षकांकडून बदलीसाठी अर्ज मागवण्यात आलेले असून आलेल्या अर्जातील प्रमाणपत्राच्या आधारे त्यांचा बदलीसाठी संवर्गनिहाय वर्गीकरण करण्यात आलेले आहे. दरम्यान, यंदा देखील शिक्षकांच्या बदल्यामध्ये अनेकांनी (पान ६ वर)

### दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई


- ग्रामविकास अविभागाने सुधारित आदेशात या पुढे शिक्षकांच्या बदली प्रक्रियेत बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून बदलीचा लाभ घेतल्यास संबंधीत शिक्षकांविरोधात कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा दिला आहे.

### घटस्फोटीत- परिक्त्यांची घरी जावून होणार समक्ष खात्री

- विशेष संवर्ग–१ मधून बदलीसाठी अर्ज करणाऱ्या घटस्फोटीत – परित्यक्त्या महिला शिक्षकांबाबत काही अनियमिता आढळून आल्यास संबंधीत घटस्फोटीत शिक्षकेच्या न्यायालयाने मंजूर केलेल्या धटस्फोटाच्या प्रमाणपत्राची प्रत, परिक्त्या शिक्षिकेने ती पतीसोबत राहत नसल्याचे सादर केलेले स्वयंघोषणापत्र, त्यांच्या रहिवासी दाखले, आधार कार्ड, शिधापत्रिका आदीवरून पडताळणी करावी. तसेच आवश्यकतेनूसार अशा महिला शिक्षकांच्या निवासी पत्त्यावर जावून प्रत्यक्षात शहानिशा करावी, असे आदेशात स्पष्ट केलेले आहे.

# प्रत्येक आजी-माजी आमदाराला अंतरवाली सराटीमध्ये बोलवणार

**मुंबई–** मनोज जरांगे गेल्या अनेक महिन्यांपासून मराठा समाजाच्या आरक्षणाचा विषय मार्गा लावावा अशी मागणी करत आहेत. मराठे आणि कुणबी एकच असून राज्यातील सर्व मराठा समाजाला आरक्षण द्यावं, अशी मागणी ते करत आहेत. मात्र सरकार आमच्याकडे लक्ष देत नाही, असं जरांगे यांनी म्हटलंय. तसेच जरांगे यांनी सरकारला यावेळी थेट अल्टिमेटम दिलंय. येत्या अधिवेशनात आमचा आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावा गुलाल घेऊन येतो. मी २९ ऑगस्टपर्यंत काहीही बोलणार



नाही. मी मुंबईला आलो तर परत जाणार नाही, असा थेट इशारा एका वृत्तवाहिनीच्या मुलाखतीत मनोज जरांगे यांनी दिला आहे.

**मराठा आणि कुणबी एकच**

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षण तसेच त्यांची आगामी रणनीती याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. मी महाराष्ट्रातील सर्व आमदारांना १४ जून रोजीपासून फोन करणार आहे. आम्ही प्रत्येक आमदाराला अंतरवाली सराटीमध्ये बोलवणार आहोत. विधानपरिषदेच्या आमदारांनाही आम्ही बोलवणार आहोत. यात आजी-माजी आमदार, खासदारही असतील. मराठा आणि कुणबी एक आहे. त्याच्या नोंदी सापडल्या आहेत. त्यामुळे मराठा आणि कुणबी एक असल्याचा कायदा पारीत करावा. सगेसोयरे मुद्द्याची अंमलबजावणी करावी, अशा मागण्या आम्ही त्यांना करणार आहोत.

**मुंबईत आलो तर परत जाणार नाही** (पान ६ वर)

# 'लाडकी बहीण योजने'वर येणार सिनेमा

## नृत्यांगणा गौतमी पाटील आणि अण्णा नाईक महत्वाच्या भूमिकेत

**मुंबई–** महाराष्ट्र राज्यातील विद्यमान सरकारच्या बऱ्याच योजनांचा लाभ जनतेला मिळत आहे. यापैकी काही योजना त्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेमुळे प्रकाशझोतात राहिल्या आहेत. लाडकी बहीण योजना सुद्धा त्यापैकीच एक आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत चर्चेत असलेली ही लाडकी बहीण योजना आता मोठ्या पडद्यावर अवतरणार आहे. 'लाडकी बहीण' असे शीर्षक असलेल्या मराठी चित्रपटाचा मुहूर्त नुकताच पार पाडण्यात आला आहे.

निर्मात्या शितल गणेश शिंदे, बाबासाहेब पाटील व अनिल वणवे हे ओम साई सिने फिल्मच्या बॅनरखाली व शुभम फिल्म प्रोडक्शन प्रस्तुत लाडकी बहीण या मराठी चित्रपटाची निर्मिती करीत आहेत. गणेश शिंदे यांच्या दिग्दर्शनाखाली हा चित्रपट तयार होणार आहे. लाडकी बहीणची पटकथा-संवादलेखन शितल शिंदे यांनी केले आहे. महाराष्ट्रातील कोट्यवधी माता-भगिनींच्या



मदतीला धावून आलेल्या महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण योजनेवर आधारित असलेल्या या सिनेमाचा नुकताच मुहूर्त करण्यात आला.

सातारा येथे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी मलाडकी बहीणफ सिनेमाच्या मुहूर्ताचा क्लॅप दिला. यावेळी कराड दक्षिणचे आमदार अतुल भोसले, कराड उत्तरचे आमदार मनोज घोरपडे, सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील, सातारा जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक तुषार दोशी, सांस्कृतिक विभाग उपाध्यक्ष पंकज चव्हाण, राजेंद्र मोहिते, अनंत काळे, महेश देशपांडे आणि तहसीलदार आदी मंडळी उपस्थित होती.

महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण योजनेचा लाभ असंख्य महिलांनी घेतला आहे. गोरगरीब जनतेच्या संसाराला हातभार लावत महाराष्ट्रातील महिला वर्गाचे आर्थिक सबलीकरण करणारी लाडकी बहीण योजना खूप गाजली. यावर चित्रपट तयार होणे हे अतिशय उत्साहवर्धक असल्याचे मत निर्मात्यांकडून व्यक्त करण्यात आले आहे. एक महत्त्वपूर्ण विषय अतिशय खेळकर पद्धतीने या चित्रपटात मांडण्यात येणार असून, लाडकी बहीणच्या रुपात परिपूर्ण कौटुंबिक मनोरंजक चित्रपट तयार करण्यात येत असल्याचे दिग्दर्शकांचे म्हणणे आहे.